महाराष्ट्र पोलीस

**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक :- २६/११/२०१८

## खुन व दरोडयाचे गुन्हयातील फरार आरोपी गजाआड - स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा॰ यांचे आदेशान्वये जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय अभिलेखावरील सराईत गुन्हेगार, गुन्हयात पाहिजे असलेले व फरार आरोपीतांचा शोध घेवुन अटक करण्याची कारवाई सुरू आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाने **दिंडोरी पोलीस ठाणे I गुन्हा रजि. नं. ३९/२०१४** भादवि कलम ३९५, ३०२, ३४ या गुन्हयात सुमारे ०५ वर्षापासुन पाहिजे असलेला सराईत गुन्हेगार नामे मनोहर मधुकर गायकवाड, वय ३२, रा. गोळशी, ता.दिंडोरी यास ताब्यात घेवुन कारवाई केली आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय दाखल असलेले गुन्हयांतील जे निष्पन्न आरोपी गुन्हा घडलेपासुन पाहिजे व फरार आहे, अशा आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेसाठी पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. दरम्यान सन २०१४ मध्ये दिंडोरी पोलीस ठाणेस दाखल असलेले खुनासह दरोडयाचे गुन्हयातील पाहिजे असलेला सराईत गुन्हेगारा हा दिंडोरी तालुक्यात आला असल्याची गोपनीय माहिती मिळालेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील पोहवा दिपक आहिरे, दत्तात्रय साबळे, गणेश वराडे, पुंडलीक राउत, पोना अमोल घुगे, वसंत खांडवी, प्रविण सानप, पोकॉ विश्वनाथ काकड यांनी दिंडोरी ते ढकांबे रोडवर सापळा रचुन **सराईत गुन्हेगार** नामे **मनोहर मधुकर गायकवाड, वय ३२, रा. गोळशी, ता.दिंडोरी** यास शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपी हा सुमारे ०५ वर्षांपासुन वरील गुन्हयात पाहिजे होता, त्याने सन २०१४ मध्ये त्याचे इतर साथीदारांसह गोळशी परिसरातील हॉटेल मालक व चालकाचा खुन करून दरोडा टाकला होता. सदर गुन्हयातील इतर आरोपीतांना यापुर्वीच अटक करण्यात आली होती, परंतु आरोपी मनोहर गायकवाड हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता. त्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने शिताफिने ताब्यात घेवुन दिंडोरी पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयामध्ये हजर केले आहे.